आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य,
प्रशासकीय इमारत,
अब्दुल गफारखान मार्ग, वरळी,
मुंबई- ४०० ०१८.

क्र.आदुवि-२१(ड)/दुवि/दर व कमिशन /२००९-१०/भाग-२ / ९५ दिनांक-०१/०१/२०१०

प्रति,

१) महाव्यवस्थापक,
बृहन्मुंबई दूध योजना, वरळी

२) प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,
मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर.

३) महाव्यवस्थापक/दुग्धशाळा व्यवस्थापक,
शासकीय दूध योजना, ..........

४) प्रकल्प अधिकारी, दुग्ध प्रकल्प, दापचरी

५) व्यवस्थापक, पालघर फार्म, पालघर

विषय- <u>शासकीय दूध योजनेमार्फत होणाऱ्या दूध विक्री दरात वाढ करणेबाबत</u>

शासकीय दूध योजनामार्फत विक्री होणाऱ्या स्थानिक दूध विक्री दरामध्ये शासनाच्या प्रदत्त समितीच्या दि.३१/१२/२००९ रोजीच्या बैठकीमध्ये गाय व म्हैस दूधाच्या विक्री दरामध्ये प्रति लिटर रु.१/- ने वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

गाय दूध ,फूल क्रिम दूध, म्हैस दूध व टोण्ड दूधाचे ग्राहक विक्री दर खालील प्रमाणे राहतील. सदर सुधारित ग्राहक दराचे अंमलबजावणी दि.०१/०१/२०१० पासून करण्यात यावी.

| अ.क्र. | योजना | दुधाचा प्रकार | एक लिटर दुधाच्या पिशवीसाठी ग्राहक विक्री दर (रु.) | अर्धा लिटर दुधाच्या पिशवीसाठी ग्राहक विक्री दर (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई दूध योजना तसेच गोवे भिवंडी योजनेच्या कार्यक्षेत्रासाठी | १) गाय दूध<br>२) फूल क्रिम दूध<br>३) टोण्ड दूध | २३.००<br>२९.००<br>२२.०० | ११.५०<br>१४.५०<br>११.०० |
| २ | इतर सर्व ग्रामीण दूध योजनांसाठी | १)गाय दूध<br>२)फूल क्रिम दूध<br>३) म्हैस दूध | २२.००<br>२८.००<br>२५.०० | ११.००<br>१४.००<br>१२.५० |

२) सद्यःस्थितीत गाय दूध व म्हैस दूधासाठी वापरण्यात येणाऱ्या पॉलिथिन पिशवीतूनच वाढीव ग्राहक किंमतीनुसार दूधाची विक्री करण्यात यावी. याबाबत अन्न व औषध प्रशासन, आरोग्य अधिकारी, महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषद, नियंत्रक, वजन व मापे यांच्या स्थानिक अधिकाऱ्यांना आपल्या स्तरावर तात्काळ कळविण्यात यावे.

३) सदर दुधाची सुधारित दराने विक्री करण्यासाठी आवश्यक असलेल्या पॉलिथिन फिल्मच्या छपाईची कार्यवाही कार्यासन अधिकारी-१२, आयुक्त दुग्धव्यवसाय विकास कार्यालय, मुंबई-१८ यांचेमार्फत करण्यात यावी.

४) बृहन्मुंबई दूध योजना व इतर सर्व योजनांनी ग्राहकांच्या माहितीसाठी सदर दुधाच्या ग्राहक किंमतीच्या वाढीबाबत जनतेच्या माहितीसाठी स्थानिक वर्तमानपत्रातून माहिती व प्रसिध्दी खात्यामार्फत निवेदन द्यावे.

उपरोक्त सूचनेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करून या कार्यालयास अवगत करण्यात यावे.

(मूळ मसुदा मा. आयुक्त यांचे मान्यतेने)

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे करिता

प्रत-

१) उप आयुक्त (वित्तीय सल्लागार ), आदुवि कार्यालय,

२) कार्यासन अधिकारी-१/२/४/८/९/१२/१३/१८ आदुवि कार्यालय, मुंबई-१८.

प्रत- <u>माहितीसाठी सादर :-</u>

सचिव (पदुम ), महाराष्ट्र शासन, कृषि व पदुम विभाग, मुंबई-३२.